| | | | |
|---|---|---|---|
| **MHAH210001732025** | दाखल दिनांक | : | १०/०२/२०२५ |
| | नोंदणी दिनांक | : | १३/०२/२०२६ |
| | निकाल दिनांक | : | २०/०५/२०२६ |
| | कालावधी | : | वर्षे ०१ महिने ०३ दिवस १० |

**भाग–अ**

Form No.XXXII

(Title page of Judgment)

(Para 44(i) of Chapter VI of Criminal Manual)

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्रमांक ०२, जामखेड, जि. अ.नगर.**

**(पिठासीन अधिकारी – श्रीमती अनुश्री ब. फंड)**

**संक्षिप्त फौजदारी प्रकरण क्रमांक ४८/२०२५    निशाणी क्रमांक ०९ लगत**

**गुन्हा क्रमांक I–५२०/२०२४, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ ई प्रमाणे, पोलीस ठाणे, जामखेड.**

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | }<br>}<br>} | महाराष्ट्र सरकारतर्फे पोलीस ठाणे अधिकारी,<br>जामखेड, ता. जामखेड<br>जि. अहमदनगर. |
| **सरकारतर्फे** | }<br>} | विद्वान श्री. ई. ए. पठाण<br>विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता. |
| | **:: विरुद्ध ::** | |
| **आरोपी** | }<br>}<br>}<br>} | **कृष्णा संजय काकडे**,<br>वय–२३ वर्षे, धंदा–व्यवसाय,<br>रा. कुसडगाव, ता. जामखेड,<br>जि. अहमदनगर |
| **आरोपींतर्फे** | } | विद्वान विधिज्ञ श्री. जी जे थोरात |

**भाग–'ब'**

(Para 44(ii) of Chapter VI of Criminal Manual)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याची दिनांक | : | २१/१०/२०२४ |
| गुन्हा दाखल दिनांक | : | २१/१०/२०२४ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | : | १०/०२/२०२५ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | : | १६/१०/२०२५ |
| पुरावा सुरू केल्याचा दिनांक | : | ०५/०१/ |
| न्यायनिर्णयास ठेवल्याचा दिनांक | : | -- |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | : | २०/०५/२०२६ |
| दोषी ठरल्याचा दिनांक, जर असल्यास | | -- |

## आरोपींचा तपशील

| आरोपींची श्रेणी | आरोपींचे नाव | अटकेचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षा दिली असल्यास किती | न्यायालयीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कृष्णा संजय काकडे | -- | २५/०४ /२०२५ | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम चे कलम ६५ ई. | निर्दोष सोडले | -- | -- |

## - न्या य नि र्ण य -
## (घोषित आज दिनांक २०/०५/२०२६ रोजी पारित)

आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम चे कलम ६५ ई प्रमाणे खटला चालविण्यात आला.

**अभियोगपक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे**-

**०२.** दिनांक २१/१०/२०२४ रोजी, १८.०० वाजण्याच्या सुमारास आरोपी नामे कृष्णा संजय काकडे याने पाडळी गावचे शिवारात, राजदिप हॉटेलच्या काउंटरला, ता. जामखेड, जि. आहिल्यानगर येथे, विना परवाना व बेकायदेशीर पद्धतीने रक्कम रुपये ९२०/- किंमतीच्या ६५० मिली लिटरच्या ४

बडवायझर बीयर कंपनीच्या सिलबंद बाटल्या, रक्कम रुपये ७३५/– किंमतीच्या ६५० मिली लिटरच्या ३ कासबर्ग बीयर कंपनीच्या सिलबंद बाटल्या, रक्कम रुपये ३९०/– किंमतीच्या ६५० मिली लिटरच्या २ टुबर्ग स्ट्रॉंग बीयर कंपनीच्या सिलबंद बाटल्या, रक्कम रुपये २५०/– किंमतीच्या ३३० मिली लिटरच्या २ टुबर्ग स्ट्रॉंग बीयर कंपनीच्या सिलबंद बाटल्या, रक्कम रुपये ३८०/– किंमतीच्या १८० मिली लिटरच्या २ रॉयल चॅलेंज व्हिस्की कंपनीच्या सिलबंद बाटल्या, रक्कम रुपये ८८०/– किंमतीच्या १८० मिली लिटरच्या ४ ग्रॅंड मास्टर वॉडका कंपनीच्या सिलबंद बाटल्या, रक्कम रुपये ६००/– किंमतीच्या १८० मिली लिटरच्या ३ मॅजिक मोमेंट वॉडका कंपनीच्या सिलबंद बाटल्या, रक्कम रुपये ३००/– किंमतीच्या १८० मिली लिटरच्या २ ऑफिसर चॉइस ब्ल्यू व्हिस्की कंपनीच्या सिलबंद बाटल्या, रक्कम रुपये ५४०/– किंमतीच्या १८० मिली लिटरच्या ४ मॅक्डॉल नं. १ रम कंपनीच्या सिलबंद बाटल्या, रक्कम रुपये ८००/– किंमतीच्या १८० मिली लिटरच्या ५ इम्पीरीअल ब्ल्यू व्हिस्की कंपनीच्या सिलबंद बाटल्या, रक्कम रुपये ४००/– किंमतीच्या १८० मिली लिटरच्या २ रॉयल ग्रीन व्हिस्की कंपनीच्या सिलबंद बाटल्या व रक्कम रुपये ६४०/– किंमतीच्या १८० मिली लिटरच्या ४ मॅक्डॉल नं. १ व्हिस्की कंपनीच्या सिलबंद बाटल्या हा मुददेमाल स्वत:च्या ताब्यात ठेवला व त्याची चोरुन विक्री करत असतांना मिळून आला. त्यामुळे तक्रारदार यांनी आरोपीविरुध्द तक्रार दाखल केली.

**०३.** आरोपीविरुध्द सदरचा गुन्हा नोंद क्रमांक I–५२०/२०२४ अन्वये नोंद करण्यात आला. त्यानंतर तपासिक अंमलदार पोलीस हेड कॉस्टेबल श्री. बी ए पाखरे यांनी सदर गुन्हयाचा तपास केला व गुन्हयाचा तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारु बंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** दिनांक १६/१०/२०२५ रोजी आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारु बंदी

कायदा कलम ६५ (ई) चे आरोपासाठी दोषारोप निशाणी क्रमांक ०९ वर नोंदविण्यात आला. उपरोक्त वेळी आरोपीला दोषारोप त्याच्या भाषेत वाचून व समजावून सांगण्यात आले. आरोपीने गुन्हा नाकबूल करुन संपरीक्षा चालविण्याची मागणी केली.

**०५.** प्रस्तुत प्रकरण प्रलंबित असतांना प्रस्तुत प्रकरणातील पंच बापु आजीनाथ गंभीरे यांना साक्षीदार क्रमांक ०१ म्हणून तपासण्यात आले. परंतु, सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता पंच/ साक्षीदार क्रमांक ०१ बापु आजीनाथ गंभीरे यांचे साक्षमध्ये आरोपीविरुध्द तसेच अभियोग पक्षास मदत होईल असे कुठलेही कथन केले नाही. त्यानंतर दिनांक २०/०५/२०२६ रोजी आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन नोंदविण्यात आले.

**०६.** अभियोग पक्षाचे कथन, साक्षीदाराचे जबाब, दाखल झालेले दस्तऐवज, व दोन्ही पक्षाचा युक्तिवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील मी माझे निष्कर्ष कारणेमिमांसेसह खालील प्रमाणे नोंदविले आहेत:-

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक २१/१०/२०२४ रोजी, १८.०० वाजण्याच्या सुमारास आरोपी नामे कृष्णा संजय काकडे हा पाडळी गावचे शिवारात, राजदिप हॉटेलच्या काउंटरला, ता. जामखेड, जि. आहिल्यानगर येथे, विना परवाना व बेकायदेशीर पद्धतीने रक्कम रुपये ९२०/- किंमतीच्या ६५० मिली लिटरच्या ४ बडवायझर बीयर कंपनीच्या सिलबंद बाटल्या, रक्कम रुपये ७३५/- किंमतीच्या ६५० मिली लिटरच्या ३ कासबर्ग बीयर कंपनीच्या सिलबंद बाटल्या, रक्कम रुपये ३९०/- किंमतीच्या ६५० मिली लिटरच्या २ टुबर्ग स्ट्रॉग बीयर कंपनीच्या सिलबंद बाटल्या, रक्कम रुपये २५०/- किंमतीच्या ३३० मिली लिटरच्या २ टुबर्ग स्ट्रॉग बीयर कंपनीच्या | **.. नकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| | सिलबंद बाटल्या, रक्कम रुपये ३८०/– किंमतीच्या १८० मिली लिटरच्या २ रॉयल चॅलेंज व्हिस्की कंपनीच्या सिलबंद बाटल्या, रक्कम रुपये ८८०/– किंमतीच्या १८० मिली लिटरच्या ४ ग्रँड मास्टर वॉडका कंपनीच्या सिलबंद बाटल्या, रक्कम रुपये ६००/– किंमतीच्या १८० मिली लिटरच्या ३ मॅजिक मोमेंट वॉडका कंपनीच्या सिलबंद बाटल्या, रक्कम रुपये ३००/– किंमतीच्या १८० मिली लिटरच्या २ ऑफिसर चॉइस ब्ल्यू व्हिस्की कंपनीच्या सिलबंद बाटल्या, रक्कम रुपये ५४०/– किंमतीच्या १८० मिली लिटरच्या ४ मॅक्डॉल नं. १ रम कंपनीच्या सिलबंद बाटल्या, रक्कम रुपये ८००/– किंमतीच्या १८० मिली लिटरच्या ५ इम्पीरीअल ब्ल्यू व्हिस्की कंपनीच्या सिलबंद बाटल्या, रक्कम रुपये ४००/– किंमतीच्या १८० मिली लिटरच्या २ रॉयल ग्रीन व्हिस्की कंपनीच्या सिलबंद बाटल्या व रक्कम रुपये ६४०/– किंमतीच्या १८० मिली लिटरच्या ४ मॅक्डॉल नं. १ व्हिस्की कंपनीच्या सिलबंद बाटल्या हा मुददेमाल स्वत:च्या ताब्यात ठेवला व त्याची चोरुन विक्री करत होता, ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली आहे का? | |
| २. | आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>मुद्दे क्रमांक ०१ व ०२ बाबत</u> –

**०७.** अभियोग पक्षाने पंच/ साक्षीदार क्रमांक ०१ बापु आजीनाथ गंभीरे यांना तपासले. सदर साक्षीदाराने त्यांच्या पुराव्यात कथन केले आहे की, दिनांक २१/१०/२०२४ रोजी पोलीसांनी त्यांना जामखेड पोलीस ठाणे येथे बोलाविले होते. त्यावेळी पोलीसांनी त्यांची फक्त एका कागदावर सही घेतली. पोलीसांनी त्यांचेसमक्ष पंचनाम्याची कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे त्यांनी त्यांच्या साक्षमध्ये कथन केले आहे. सदर साक्षीदाराने पंचनाम्यावरील केवळ त्याची सही

निशाणी क्रमांक १२ ओळखली व त्यातील मजकुराबाबत अनभिज्ञता दर्शविली. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य केले नसल्यामुळे त्यांना फितुर घोषित करुन त्यांचा उलटतपास घेतला परंतु अभियोग पक्षास उपयुक्त होईल असा कोणताही पुरावा पटलावर आलेला नाही.

०८. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी व तपासिक अंमलदार यांना अभियोगपक्षाने तपासलेले नाही त्यामुळे रासायनिक परिक्षणासाठी वेगळे काढलेले नमुने कोणत्या परिस्थितीत, कशाप्रकारे व कोणत्या साहित्याने सिलबंद केले होते याबाबत कोणतीही माहिती अभिलेखावर आलेली नाही व फिर्याद सिध्द झालेली नाही. त्यामुळे आरोपी हा दारु विक्री करण्याच्या उद्देशाने त्यांच्या ताब्यात मुद्देमाल बाळगून होता व तो सर्व मुद्देमाल पोलीसांनी जप्त केला या अभियोगपक्षाच्या हकिकतीबाबत एकूणच संशय उत्पन्न होतो.

०९. त्याचप्रमाणे प्रस्तुत प्रकरणातील जप्त केलेला मुद्देमाल कोणत्या कर्मचाऱ्यामार्फत तपासीक अंमलदार यांनी रासायनिक परिक्षणाकरिता रासायनिक प्रयोगशाळेत पाठवला होता ही माहिती देखील अभिलेखावर आलेली नाही. तसेच अभिलेखाचे बारकाईने अवलोकन केले असता असे स्पष्टपणे दिसून येते की, तपासयंत्रणेकडून आरोपीच्या ताब्यातून तथाकथित जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालापैकी रासायनिक परीक्षणाकरिता काढून घेण्यात आलेल्या नमुन्यांचा रासायनिक पृथक्करण अहवाल (Chemical Analysis Report) आजतागायत न्यायालयासमोर सादर करण्यात आलेला नाही. तथापि, सदर जप्त करण्यात आलेला मुद्देमाल हा दारूच होता किंवा नाही, अथवा तो प्रतिबंधित स्वरूपाचा होता की कसे, ही अत्यावश्यक बाब रासायनिक पृथक्करण अहवालाविना सिद्ध होणे कायदेशीरदृष्ट्या शक्य नाही. म्हणून, सद्यःस्थितीत प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षास आरोपीविरुद्ध आरोप संपूर्ण संशयापलीकडे सिद्ध करता येत नाही. वरील सर्व कारणांचा एकत्रित विचार करता, अभियोग पक्ष आरोपीविरुद्ध ठेवलेला आरोप संपूर्णपणे संशयापलीकडे सिद्ध करण्यात पूर्णतः अपयशी ठरलेला आहे. त्यामुळे

आरोपीस संशयाचा फायदा (Benefit of Doubt) देण्यात येतो. तसेच प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुददेमाल हा विल्हेवाटीसाठी राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, अहमदनगर यांचेकडे पाठविणेबाबत आदेश पारीत करणे न्यायोचित होईल. त्यामुळे मी मुद्दा क्रमांक ०१ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे. करिता मी मुद्दा क्रमांक ०२ चे उत्तराकरिता पुढील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## : आदेश :

| | |
|---|---|
| **०१.** | आरोपी कृष्णा संजय काकडे यांची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये शिक्षेस पात्र अपराधाच्या आरोपामधून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८(१) [फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५(१)] नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| **०२.** | आरोपीचे जामिनपत्र व वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत. |
| **०३.** | प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल म्हणजेच रक्कम रुपये ९२०/- किंमतीच्या ६५० मिली लिटरच्या ४ बडवायझर बीयर कंपनीच्या सिलबंद बाटल्या, रक्कम रुपये ७३५/- किंमतीच्या ६५० मिली लिटरच्या ३ कासबर्ग बीयर कंपनीच्या सिलबंद बाटल्या, रक्कम रुपये ३९०/- किंमतीच्या ६५० मिली लिटरच्या २ टुबर्ग स्ट्रॉग बीयर कंपनीच्या सिलबंद बाटल्या, रक्कम रुपये २५०/- किंमतीच्या ३३० मिली लिटरच्या २ टुबर्ग स्ट्रॉग बीयर कंपनीच्या सिलबंद बाटल्या, रक्कम रुपये ३८०/- किंमतीच्या १८० मिली लिटरच्या २ रॉयल चॅलेंज व्हिस्की कंपनीच्या सिलबंद बाटल्या, रक्कम रुपये ८८०/- किंमतीच्या १८० मिली लिटरच्या ४ ग्रँड मास्टर वॉडका कंपनीच्या सिलबंद बाटल्या, रक्कम रुपये ६००/- किंमतीच्या १८० मिली लिटरच्या ३ मॅजिक मोमेंट वॉडका कंपनीच्या सिलबंद बाटल्या, रक्कम रुपये ३००/- किंमतीच्या १८० मिली लिटरच्या २ ऑफिसर चॉइस ब्ल्यू व्हिस्की कंपनीच्या सिलबंद बाटल्या, रक्कम रुपये ५४०/- किंमतीच्या १८० मिली लिटरच्या ४ मॅक्डॉल नं. १ रम कंपनीच्या सिलबंद बाटल्या, रक्कम रुपये ८००/- किंमतीच्या १८० मिली लिटरच्या ५ इम्पीरीअल ब्ल्यू व्हिस्की कंपनीच्या सिलबंद बाटल्या, रक्कम रुपये ४००/- किंमतीच्या १८० मिली लिटरच्या २ रॉयल ग्रीन व्हिस्की कंपनीच्या सिलबंद बाटल्या व रक्कम रुपये ६४०/- किंमतीच्या १८० मिली लिटरच्या ४ मॅक्डॉल नं. १ व्हिस्की कंपनीच्या सिलबंद बाटल्या अपील कालावधीनंतर विल्हेवाटीसाठी राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, अहमदनगर यांचेकडे |

| | |
|---|---|
| | पाठविण्यात याव्यात. |
| **०४.** | भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१(१) [फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ] चे तरतुदीच्या पुर्ततेच्या अनुषंगाने, आरोपीने रक्कम रुपये १५,०००/– चा नवीन वैयक्तिक जात मुचलका द्यावा व सदरचा जात मुचलका हा पुढील सहा महिन्यांपर्यंत अस्तीत्वात राहतील. |

**सही/–**
**(अनुश्री ब. फंड)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्रमांक ०२),
**जामखेड**.

दिनांकः– २०/०५/२०२६
ठिकाणः– जामखेड

**भाग–'क'**

(Para 44(iii) of Chapter VI of Criminal Manual)

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार/ आरोपीतर्फे साक्षीदार/ न्यायालयीन साक्षीदार यांची यादी;**

**अ. <u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार</u>**

| **साक्षीदार क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचे स्वरूप** |
|---|---|---|
| साक्षीदार क्रमांक ०१ | बापु आजीनाथ गंभीरे | पंच |

**ब. <u>आरोपीतर्फे साक्षीदार/बचाव पक्षाचे साक्षीदार असतील तर</u>**

| **साक्षीदार क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचे स्वरूप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. <u>न्यायालयीन साक्षीदार, असतील तर</u>**

| **साक्षीदार क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचे स्वरूप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**<u>अभियोगपक्ष/आरोपी/न्यायालयीन पुराव्यांची यादी</u>**

**अ. <u>अभियोगपक्षाचा पुरावा</u>**

| **निशाणी क्रमांक** | **कागदत्रांचे वर्णन** |
|---|---|
| **१२** | पंचनाम्यावरील सही |

## ब. आरोपीतर्फे पुरावा

| निशाणी क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## क. न्यायालयीन पुरावा

| निशाणी क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## ड. मुद्देमाल

| अनु. क्रमांक | मुद्देमाल रजिस्टर क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१. | ५२०/२०२४ | रक्कम रुपये ९२०/- किंमतीच्या ६५० मिली लिटरच्या ४ बडवायझर बीयर कंपनीच्या सिलबंद बाटल्या. |
| ०२. | ५२०/२०२४ | रक्कम रुपये ७३५/- किंमतीच्या ६५० मिली लिटरच्या ३ कासबर्ग बीयर कंपनीच्या सिलबंद बाटल्या. |
| ०३. | ५२०/२०२४ | रक्कम रुपये ३९०/- किंमतीच्या ६५० मिली लिटरच्या २ टुबर्ग स्ट्रॉंग बीयर कंपनीच्या सिलबंद बाटल्या. |
| ०४. | ५२०/२०२४ | रक्कम रुपये २५०/- किंमतीच्या ३३० मिली लिटरच्या २ टुबर्ग स्ट्रॉंग बीयर कंपनीच्या सिलबंद बाटल्या. |
| ०५. | ५२०/२०२४ | रक्कम रुपये ३८०/- किंमतीच्या १८० मिली लिटरच्या २ रॉयल चॅलेंज व्हिस्की कंपनीच्या सिलबंद बाटल्या. |
| ०६. | ५२०/२०२४ | रक्कम रुपये ८८०/- किंमतीच्या १८० मिली लिटरच्या ४ ग्रँड मास्टर वॉडका कंपनीच्या सिलबंद बाटल्या. |
| ०७. | ५२०/२०२४ | रक्कम रुपये ६००/- किंमतीच्या १८० मिली लिटरच्या ३ मॅजिक |

| | | |
|---|---|---|
| | | मोमेंट वॉडका कंपनीच्या सिलबंद बाटल्या. |
| ०८. | ५२०/२०२४ | रक्कम रुपये ३००/- किंमतीच्या १८० मिली लिटरच्या २ ऑफिसर चॉइस ब्ल्यू व्हिस्की कंपनीच्या सिलबंद बाटल्या. |
| ०९. | ५२०/२०२४ | रक्कम रुपये ५४०/- किंमतीच्या १८० मिली लिटरच्या ४ मॅक्डॉल नं. १ रम कंपनीच्या सिलबंद बाटल्या. |
| १०. | ५२०/२०२४ | रक्कम रुपये ८००/- किंमतीच्या १८० मिली लिटरच्या ५ इम्पीरीअल ब्ल्यू व्हिस्की कंपनीच्या सिलबंद बाटल्या. |
| ११. | ५२०/२०२४ | रक्कम रुपये ४००/- किंमतीच्या १८० मिली लिटरच्या २ रॉयल ग्रीन व्हिस्की कंपनीच्या सिलबंद बाटल्या. |
| १२. | ५२०/२०२४ | रक्कम रुपये ६४०/- किंमतीच्या १८० मिली लिटरच्या ४ मॅक्डॉल नं. १ व्हिस्की कंपनीच्या सिलबंद बाटल्या. |

**सही/-**
**(अनुश्री ब. फंड)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्रमांक ०२),
**जामखेड**.

दिनांक:- २०/०५/२०२६
ठिकाण:- जामखेड